महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(२)(३)/२०२१/तेवीस दिनांक : २१ जून, २०२४

## -: प्रसिद्धीपत्रक :-

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट - ब मुख्य परीक्षा- २०२१
पोलीस उपनिरीक्षक संवर्गाचा खेळाडू उमेदवारांसह सुधारित अंतिम निकाल
जाहिरात क्रमांक २४९/२०२१ व अधिसूचना क्रमांक ४९/२०२२
संदर्भ : आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ३० मे, २०२४ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन प्रसिध्दीपत्रकान्वये पोलीस उपनिरीक्षक संवर्गाचा निकाल खेळाडू उमेदवारांची पदे वगळून प्रसिध्द करण्यात आला होता. प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या खेळाडू उमेदवारांची क्रीडा प्रमाणपत्र व पडताळणी अहवाल, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचेकडे पुनर्पडताळणीसाठी पाठविण्यात आली होती. त्यापैकी ०४ खेळाडू उमेदवार यांचा अहवाल प्रलंबित असून उर्वरित उमेदवारांचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्यामधील २ खेळाडू उमेदवारांचा [अराखीव (खेळाडू)-१ व वि.जा.(अ)(खेळाडू)-१] निकाल त्यांच्या क्रीडा प्रमाणपत्राची पडताळणी प्रलंबित असल्याच्या कारणास्तव राखून ठेऊन अन्य १८ खेळाडू उमेदवारांचा निकाल जाहीर करण्यात येत आहे.

२. राखीव २ खेळाडू उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्यानंतर सर्व उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल.

३. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (Cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

४. प्रस्तुत निकालाधारे शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठयर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहेत. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. प्रस्तुत परीक्षेचा निकाल मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

६. खेळाडू उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्यानंतर सर्व उमेदवारांना त्यांच्या गुणपत्रिकेतील गुणांची पडताळणी करण्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करून देण्यात येईल.

उपसचिव (परीक्षोत्तर) (अराजपत्रित)
ठिकाण : नवी मुंबई महाराष्ट्र लोकसेवा आयोग